पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा. शिक्षण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

दिनांक – **०२/०१/२०२०** वेळ - **दुपारी २.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची पाक्षिक सभा **गुरुवार** दिनांक **०२/०१/२०२०** रोजी दुपारी **२.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.सागर बाळासाहेब गवळी
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

---------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये नाटयशास्त्र तज्ञ शिक्षकांची मानधनावर नेमणूक करण्याबाबत. – मा.चंदा लोखंडे ,मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत १०० विद्यार्थ्यांकरिता वस्तीगृह उपलब्ध करुन देणेबाबत. – मा.चंदा लोखंडे ,मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत क्षेत्रिय कार्यालयात येणा-या प्राथमिक शाळेचे स्ट्रक्चर ऑडिट करुन भौतिक सुविधा विषयक कामे करुन घेणेबाबत.– मा.चंदा लोखंडे , मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) पिंपरी चिंचवड महानगरपालिका शिक्षण समितीमध्ये तीन वर्षासाठी मानधनावर शिक्षणतज्ञांची नेमणूक करणेबाबत.-मा.चंदा लोखंडे , मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्राथमिक शाळेतील इ.७वी.तील विद्यार्थ्यांना टॅब खरेदी करणेबाबत. –मा.चंदा लोखंडे ,मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) सन २०२०-२१ सालासाठी मनपा प्राथमिक शाळेमधील विद्यार्थ्यांसाठी शालेय उपयोगी साहित्य खरेदीसाठी DBT प्रक्रीया न करता निविदा पध्दतीने खरेदी करणेबाबत.- मा.चंदा लोखंडे , मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग व्यवस्थापन व नियंत्रणाचे दृष्टीने एकत्रित करणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

विषय क्र ९) बालवाडी शिक्षिकांचे पगार(मानधन) वाढीबाबत. – मा.सुलक्षणा धर , मा.निर्मला गायकवाड यांचा प्रस्ताव.

विषय क्र.१०) पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये इ.१ली ते इ. २री चे विद्यार्थ्यांकरीता स्वच्छताकिट खरेदी करणेबाबत. – मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांचा प्रस्ताव.

---------

**खालीलप्रमाणे सुचना मांडण्यात आली**

सुचक – मा.निर्मला गायकवाड अनुमोदक – मा.सुलक्षणा धर

सी.एम.ई.दापोडी येथे पुल बांधणी सरावावेळी अपघात होऊन निधन झालेले जवान भिवा खंडू वाघमोडे, व संजीवन पी.के. तसेच रामदास मोरे, राष्ट्रवादी पक्ष कार्यलयाचे सचिव , पिंपळे गुरव येथील रहिवाशी जयसिंग अप्पासाहेब जगताप यांचे नुकतेच निधन झालेले असल्याने त्यांना श्रध्दांजली वाहून आज दि.०२/०१/२०२० रोजीची सभा दिनांक ०४/०१/२०२० रोजी दु.१२.३० वा.पर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)**

**सभापती –** शनिवार दि.०४/०१/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

**(पवार मनिषा प्रमोद )**
**सभापती**
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा. शिक्षण समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १०

**सभावृत्तांत**

( ०२/०१/२०२० ची तहकूब सभा )

दिनांक – ०४/०१/२०२० वेळ – दुपारी १२.३० वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शिक्षण समितीची दिनांक ०२/०१/२०२० ची तहकूब सभा शनिवार दिनांक ०४/०१/२०२० रोजी दुपारी १२.३० वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. **मा. पवार मनिषा प्रमोद - सभापती**
२. मा.लोखंडे चंदा राजू
३. मा.सागर बाळासाहेब गवळी
४. मा.गायकवाड निर्मला मनोज
५. मा.वैशाली जालिंदर काळभोर
६. मा.सुलक्षणा राजू धर
७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
८. मा.दर्शले रेखा राजेश

या शिवाय मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्राथमिक शिक्षण विभाग) मा.मुंढे – प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक २१/११/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०७**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

आ) दिनांक ०५/१२/२०१९ , १९/१२/२०१९, २३/१२/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०८**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

इ) दिनांक १९/१२/२०१९ व २३/१२/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (**कार्यपत्रिका क्रमांक ०९**) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

------------

ठराव क्रमांक – ३०    विषय क्रमांक – ०१

दिनांक – ०४/०१/२०२०    विभाग – शिक्षण विभाग प्राथमिक

सुचक – मा.सागर गवळी    अनुमोदक– मा.चंदा लोखंडे

संदर्भ – मा.अतिरिक्त आयुक्त(१) यांचे पत्र क्र.शि.आस्था/१/कावि /३७८/२०२०, दि.०७/१०/२०१९

विषय – दापोडी कन्या शाळा सकाळ सत्रात भरणेबाबत.

**विषय क्र.१ दप्तरी दाखल करणेत येत आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ३१    विषय क्रमांक - ०२

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे    अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. मनपा शाळेतील विद्यार्थांच्या अंगी असलेल्या कलागुणांचा विकास होणेकामी व त्यांना उज्वल भविष्य मिळावे. पिंपरी चिंचवड शहराच्या मनपा शाळेतील विदयार्थीच्या अंगी असलेली कलागुंणाचा विकास होणेकामी नाटयरंगभूमीवरुन व्यासपीठ निर्माण होणेकामी त्यांना शालेयस्तरावर नाटयशास्त्र तज्ञ मार्गदर्शन मिळणेकामी नाटयशास्त्र तज्ञ शिक्षक मानधनावर नियुक्ती करणेस व याकामी होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहत सदर ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३२    विषय क्रमांक - ०३

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे    अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड शहर औद्योगिक नगरी असून कष्टकरी कामगार वर्गातील बहुसंख्य विदयार्थी पिं.चिं.महानगरपालिकाचे सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये शिक्षण घेत आहेत. त्यांच्या कुटुंबाची आर्थीक परिस्थीती बिकट असून त्यांना राहण्यासाठी छोटी घरे असल्याने जागे अभावी आपल्या पाल्यास चांगले शिक्षण देणे सहज शक्य होत नाही. मनपाच्या शाळांमध्ये शिक्षण घेत असतांना परिस्थीती गरिब असल्याने जागे अभावी विद्यार्थांना अभ्यासात अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागतो. याचाच एक परिणाम म्हणून ते अभ्यासामध्ये मागे पडतात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये

बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती सतत प्रयत्न करीत आहे. त्याच अनुषंगाने महानगरपालिका क्षेत्रात प्राथमिक शिक्षण विभागामार्फत १०० विदयार्थ्यांकरीता वस्तीगृह उपलब्ध करुन देणेकामी मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३३ विषय क्रमांक - ०४

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण समिती सदस्यांचा दौरा चालू असताना शाळेतील भौतिक सुविधा बाबत अनेक समस्या निदर्शनास आल्या आहेत. तरी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या स्थापत्य विभागामार्फत आपल्या क्षेत्रिय कार्यालयात येणा-या प्राथमिक शाळेचे स्टक्चरल ऑडिट करून शाळेतील भौतिक सुविधा विषयक उदा. स्वछतागृह ( विशेषता: मुलींची ), इमारतीची देखभाल व दुरुस्ती, इमारतीच रंग ( सर्व शाळा इमारतींना एकच रंग ) कामे लवकरात लवकर करून घेणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३४ विषय क्रमांक - ०५

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. आपल्या महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरिता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थामध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. शिक्षण समितीमध्ये तीन वर्षासाठी मानधनावर शिक्षणतंज्ञ नेमण्यात आल्यावर त्यांच्या अनुभवाने विद्यार्थांच्या गुणवत्ता वाढीसाठी अधिक विद्यार्थी उपयोगी उपक्रम, शिक्षणाचा दर्जा उंचविण्यासाठी शिक्षकांना योग्य मार्गदर्शन अशा अनेक योजना यशस्वीरित्या राबविण्यात येतील त्यामुळे विद्यार्थानाही शाळेची गोडी निर्माण होण्यास मदत होईल व मनपा प्राथमिक शाळेकडे विद्यार्थाचा कल जास्त वाढून विद्यार्थी पटसंख्येत वाढ होईल याकामी तीन वर्षासाठी मानधनावर शिक्षणतंज्ञाची नेमणूक करणेस व होणा-या खर्चास मान्यता घेणेकामी

मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३५ विषय क्रमांक - ०६

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या १२ प्राथमिक शाळा हया उपक्रमशील आहेत. सदर शाळामधील विद्यार्थांमध्येही आपल्या शाळेविषयी तसेच अधिकाधिक शिक्षणाची आवड निर्माण होण्याकरिता विद्यार्थांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व आपल्या मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरिता शिक्षण विभागामार्फत १२ उपक्रमशील प्राथमिक शाळेतील इ. ५ वी ते इ. ८ वी तील विद्यार्थांना टॅब खरेदी करण्यासाठी शिक्षण समिती ठराव क्र. २२ दिनांक - २३/१२/२०१९ रोजी करण्यात आला होता. सदर ठरावामध्ये दुरुस्ती करुन प्राथमिक शाळेतील इ. ७ वी तील विद्यार्थांना टॅब खरेदी करण्यास तसेच याकरिता होणा-या खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ३६ विषय क्रमांक - ०७

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.चंदा लोखंडे अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.चंदा लोखंडे, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक विद्यालयामध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. त्यांची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्याने त्यांना मोफत शालेय साहित्य महानगरपालिके मार्फत देण्यात येते. सदर साहित्य खरेदी करण्याकरिता D BT प्रक्रिया राबविल्यास त्याचा फायदा विद्यार्थांना होत नाही व विद्यार्थी हया सर्व साहित्यांपासून वंचित राहू शकतात. तरी सन २०२०-२१ सालासाठी मनपा प्राथमिक शाळेमधील विद्यार्थासाठी शालेय उपयोगी साहित्य खरेदीसाठी DBT प्रक्रिया न करता निविदा पद्ध्तीने खरेदी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ३७ विषय क्रमांक - ०८

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत माध्यमिक शिक्षण विभाग व प्राथमिक शिक्षण विभाग ही दोन स्वतंत्ररित्या सद्य:स्थितीत कार्यरत आहेत. पिंपरी चिंचवड महानगपालिकेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थांचे विद्यार्थांच्या शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याच्या दृष्टीने ताचेच शिक्षण समिती अस्तित्वात आल्याने RTE २००९ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका प्राथमिक व माध्यमिक शिक्षण विभाग व्यवस्थापन व नियंत्रणाचे दृष्टीने एकत्रित करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ३८ विषय क्रमांक - ०९

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.सुलक्षणा धर अनुमोदक : मा.निर्मला गायकवाड

मा.सुलक्षणा धर, मा.निर्मला गायकवाड यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत एकूण २०७ बालवाड्या असून एक मुख्य समन्वयक, २ विभागीय समन्वयक तसेच २ सेविका कार्यरत आहेत. असे एकूण २१२ कर्मचारी आहेत. सहा वर्षापासून त्यांच्या मानधनात वाढ झालेली नाही. सध्याच्या महागाईचा विचार करता त्यांच्या मानधनात वाढ (रू.२०००/-) करणेस मान्यता देणेत येत आहे.

सध्याचे मिळणेरे मानधन खालीलप्रमाणे---

| **सध्याचे मानधन** | **-** | **वाढवून द्यावयाचे मानधन** |
|---|---|---|
| ५ वर्षापर्यंत सेवा – रू. ७०००/- | | रू.९०००/- |
| १० वर्षापर्यंत सेवा – रू. ८०००/- | | रू.१००००/- |
| १५ वर्षापर्यंत सेवा – रू. ९०००/- | | रू.११०००/- |
| २० वर्षापर्यंत सेवा – रू.१००००/- | | रू. १२०००/- |
| २० वर्षापुढील सेवा - रू.११०००/- | | रू.१३०००/- |

३० वर्ष सेवा झालेल्या बालवाडी ताईंना रू.१५०००/- मानधन

वरीलप्रमाणे मानधनात वाढ करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----------

ठराव क्रमांक - ३९ विषय क्रमांक - १०

दिनांक - ०४/०१/२०२०

सुचक : मा.निर्मला गायकवाड अनुमोदक : मा.रेखा दर्शले

मा.निर्मला गायकवाड, मा.रेखा दर्शले यांनी प्रस्तावित केलेनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये बहुतेक शिक्षण घेणारे विद्यार्थी हे गरीब परिस्थितीतून येत असतात. महानगरपालिकेतील शाळेचा दर्जा खाजगी शाळेच्याप्रमाणे करण्यासाठी, विद्यार्थ्यांमध्येही मनपा शाळेविषयी आवड निर्माण होण्याकरीता तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता वाढ करण्याकरिता व मनपा शाळांची पटसंख्या वाढण्याकरीता शिक्षण समिती प्रयत्न करीत आहे. तसेच मनपा शाळेतील विद्यार्थ्यांच्या आरोग्याकडेही पाहणे गरजेचे असल्याने त्याकरीता पिंपरी चिंचवड महानगरपालिका सर्व प्राथमिक शाळांमध्ये इ.१ली ते इ.२रीचे अंदाजे ११२०८ विद्यार्थ्यांकरीता स्वच्छताकिट खरेदी करणेकामी मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता सदर ठराव मा.स्थायी समिती समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( पवार मनिषा प्रमोद )**
सभापती
शिक्षण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/१२/२०२०
दिनांक : ०६/०१/२०२०

**(उल्हास बबनराव जगताप)**
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.